जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक - १८६ दिनांक - २७/०३/२०२४**

चंदननगर पोलीस स्टेशन.पुणे शहर

## मालकाचे घरी दीड लाखाची चोरी करुन फरार झालेल्या आरोपीस अवघ्या ०२ तासात केले जेरबंद

तक्रारदार यांनी दिले तक्रार वरून चंदननगर पो.स्टे गुन्हा रजि.नं.१२९/२०२४, भादंविक ३८१ अन्वये गुन्हा नोंद करणेत आला आहे.यातील फिर्यादी यांचा फर्निचरचा व्यवसाय असुन दाखल गुन्हयातील आरोपी मोडाराम भोमाराम काकड,वय २८, रा. हेमपुराखिंवसर, जिल्हा नागोर, राज्य राजस्थान, हा दोनच दिवसापुर्वी त्यांचे कडे कामाला लागला होता. फिर्यादी घरी नसल्याची संधी साधुन त्यांने त्यांचे कपाटातील ठेवलेला लॅपटॉप व रोख रक्कम असा एकुण १,४१,०००/- रुपये किं.चा मुद्देमाल घेवुन पळ काढला होता.

सदर आरोपीचा शोध घेत असताना तपास पथकातील पोलीस अंमलदार शिवाजी धांडे व शेखर शिंदे यांना त्यांचे बातमीदारामार्फेत बातमी मिळाली की, आरोपी मोडाराम काकड हा पुणे रेल्वे स्टेशन पुणे येथुन रेल्वेने त्याचे मुळगावी राजस्थान येथे जाणार असल्याची खात्रीशीर बातमी मिळाल्याने मिळालेल्या बातमी प्रमाणे तपास पथकातील टिम पुणे रेल्वे स्टेशन येथे रवाना होवुन आरोपीचा शोध घेत असताना, आरोपी हा राजस्थानकडील जाणा-या धावत्या रेल्वे मध्ये चढताना त्यास ताब्यात घेवुन त्याचे नाव पत्ता विचारता त्यांने त्याचे नाव मोडाराम भोमाराम काकड,वय २८, धंदा नोकरी, रा. हेमपुराखिंवसर, जिल्हा नागोर, राज्य राजस्थान असे असल्याचे सांगितल्याने पुढील कार्यवाही कामी चंदननगर पोलीस स्टेशन येथे आणुन दाखल गुन्ह्यात अटक करुन फिर्यादी यांचा चोरी केलेला १,१४,०००/- रु.किं.चा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस उप निरीक्षक तान्हाजी शेगर, हे करीत आहेत.

सदरची कामगिरी ही मा.पोलीस उप आयुक्त, परिमंडळ ४ श्री. विजय मगर, मा. सहा. पोलीस आयुक्त, येरवडा विभाग- श्री. संजय पाटील चंदननगर पोलीस स्टेशनचे. वरीष्ठ पोलीस निरीक्षक पुणे श्रीमती मनीषा पाटील, पोलीस निरीक्षक (गुन्हे) श्री.पंडित रेजितवाड, यांचे मार्गदर्शनाखाली पो.उप.निरीक्षक तान्हाजी शेगर, पोलीस अंमलदार- अविनाश संकपाळ, श्रीकांत शेंडे, विष्णु गोने, महेश नाणेकर, सचिन रणदिवे शिवाजी धांडे, गणेश हांडगर, शेखर शिंदे, श्रीकांत कोद्रे, सुरज जाधव, नामदेव गडदरे, विकास कदम, ज्ञानोबा लहाणे यांनी केली आहे.